सदरक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

दिनांक :१२/०८/२०२२

# मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९

## अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या उमेदवारांना वैद्यकीय चाचणीबाबत सुचना

- मुंबई पोलीस शिपाई भरती-२०१९ प्रक्रियेतील अंतरिम प्रतिक्षा यादीतुन अंतरिम निवड यादीत समावेश झालेल्या सोबतच्या यादीतील अ.क्र १ ते ६ उमेदवारांनी वैद्यकीय चाचणीसाठी दि. ०४/०८/२०२२ रोजी बोलविण्यात आले होते. सदर उमेदवार वैद्यकीय चाचणीसाठी गैरहजर राहीले आहे.त्या उमेदवारांना अंतिम संधी देणेकामी आणि अ.क्र ७ वरील उमेदवारास न्यायालयीन प्रकरणी झालेल्या आदेशानुसार वैद्यकीय चाचणीसाठी बोलविण्यात येत आहे. यादीतील नमूद उमदेवारांनी **पोलीस शल्य चिकित्सक, नागपाडा पोलीस रुग्णालय, भायखळा, मुंबई- ४०० ००८ येथे दिनांक १८ /०८ /२०२२ रोजी सकाळी ०९:०० वा. न चुकता उपस्थित रहावे.** वैद्यकीय चाचणीस गैरहजर राहील्यास कोणतेही अभिवेदन विचारात न घेता निवड रद्द करण्यात येईल.
- वैद्यकीय तपासणी "महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वेळोवेळीच्या आदेशांनुसार करण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीत १) दृष्टीदोष, २) तिरळेपणा, ३) रातआंधळेपणा, ४)वर्णांधतेपणा, ५) गुडघ्यास गुडघा लागणे, ६) सपाट तळवे, ७) त्वचारोग, ८) छातीचे रोग, ९) तोतरेपणा या चाचण्यांचा समावेश असुन या चाचण्यांमध्ये दोष आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवुन त्याची निवड रद्द करण्यात येईल.
- उमेदवाराने वैद्यकीय चाचणीच्या दिनांकास व वेळेस न चुकता उपस्थित राहणे आवश्यक आहे. उमेदवार वैद्यकीय चाचणीसाठी अनुपस्थित राहिल्यास कोणतीही सुचना न देता त्याची निवड रद्द करण्यात येईल. त्याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची असुन त्याबाबत कुठलेही अभिवेतन विचारात घेतले जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीस येताना अलीकडील कालावधीतील ०४ पासपोर्ट आकाराचे फोटो व सर्व मूळ कागदपत्रे/ प्रमाणपत्रे न चुकता सोबत आणावीत.
- वैद्यकीय चाचणीत तात्पुरते अपात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांना पोलीस शल्यचिकित्सक यांच्या शिफारशीनुसार सर जे.जे. समूह रुग्णालयातील संबंधित वैद्यकीय मंडळाकडे/विभागाकडे पुढील तपासणीसाठी पाठविण्यात येईल.
- वैद्यकीय चाचणीसाठी उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. त्यासाठी उमेदवारास कोणत्याही प्रवास खर्च दिला जाणार नाही.
- वैद्यकीय चाचणीच्या वेळी कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैर प्रकारांचा अवलंब केल्यास त्यांना अपात्र ठरवून त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- नियुक्ती प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय उमेदवारास बंधनकारक राहील.
- पोलीस शिपाई भरती प्रक्रिया अंतर्गत वैद्यकिय चाचण्यात अथवा पुढील प्रक्रियेसंदर्भात कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरूपाची मागणी केल्यास उमेदवारांनी त्या बाबतची माहिती अँटी करप्शन ब्युरो मुंबई यांना ०२२-२४९५२०५० व हेल्पलाइन नंबर १०६२ या क्रमांकावर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी.
- वैद्यकिय चाचण्यात व पुढील प्रक्रियेत गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवार सदर बाब संबंधित पोलिस अधिकाऱ्यांच्या/ वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देऊ शकतील.
- उमेदवारांनी ७२ तासाच्या आतील कोविड-१९ संबंधी ॲन्टीजेन चाचणीचे प्रमाणपत्र (निगेटीव्ह) सोबत आणणे बंधनकारक राहील.
- पोलीस भरती बाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे उमेदवाराने काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

**( शाम घुगे )**
सदस्य, मुंबई पोलीस शिपाई (चालक) भरती-२०१९ समिती,
तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२), मुंबई.

| Sr. No. | CHEST NO | Name | ROLL NO | GENDER |
|---|---|---|---|---|
| 1 | 970 | ABHISHEK VASANT PARLE | 6825135514 | MALE |
| 2 | 1197 | RAHULKUMAR MADHUKAR GAWAI | 6014095683 | MALE |
| 3 | 1331 | SANTOSH HANAMANT KADAM | 6379113108 | MALE |
| 4 | 6008 | VISWAS ASHOK MORE | 1070002338 | MALE |
| 5 | 8055 | ANIL SHANKAR MEDEDAR | 6409114474 | MALE |
| 6 | 1604 | AARATI REVANNATH KARDILE | 6119099948 | FEMALE |
| 7 | 4131 | SOPAN DINKAR KOLI | 2973052314 | MALE |